HAPPY NEW YEAR 2021

दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

epaper www.dsahasik.in

नुतनवर्षाच्या आमच्या मनःस्वी हार्दिक शुभेच्छा!

वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा, गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!

वर्ष : १४ | अंक :१६४ | शुक्रवार १ जानेवारी २०२१ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

# देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच बलात्काराची खोटी तक्रार देणाऱ्या महिलेविरुद्ध
# जन्मठेपेची शिक्षा असलेल्या गुन्ह्या अंतर्गत न्यायालयाकडून कारवाई



ॲड. निलेश ओझा
राष्ट्रीय अध्यक्ष
इंडियन बार असोसीएशन



रशिदखान पठान
राष्ट्रीय सचिव
मानव अधिकार सुरक्षा परिषद,
जिल्हाध्यक्ष
मुस्लिम शेख



ॲड. विवेक रामटेके
चेअरमन
ऑल इंडिया एस.सी., एस. टी.
ॲन्ड मायनॉरीटी लॉयर्स असोसिएशन

- खोट्याा तक्रारी देणाऱ्या महिलांची दुकानदारी बंद
- न्यायालयीन अधीक्षक स्वत: फिर्यादी होवून चालविणार केस
- फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३४०,१९५ नुसार दिलेल्या अर्जावर न्यायालयाचे आदेश
- भा.दं.वि. १९३, १९४, १९९, २००, २११ अंतर्गत महिलेविरुद्ध केस चालविणार आहे व हे प्रकरण सेशन्स ट्रायेबल असून सत्र न्यायालयात खटला चालणार

  असून संबंधित गुन्ह्यामध्ये आरोपी महिलेस कमीत-कमी १० वर्षे व त्यापुढे आजीवन कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे
- याआधी पोलीस तपास अधिकाऱ्यांविरुद्ध भादं.वि. १९४ २११आदी कलमांतर्गत सर्वोच्च न्यायालयाने अशीच कारवाई योग्य ठरविली होती.
- अश्या प्रकरणात आरोपींना जामीन न देता तुरुंगातच ठेवून केस चालविण्याचा कायदा आहे.

*विशेष प्रतिनिधी/ ३१ डिसेंबर*

**पुणे :** महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा दुरुपयोग हा गैरहेतू साध्य करण्यासाठी करून पुणे येथील प्रतिष्ठित बिल्डरविरुद्ध बलात्काराची खोटी तक्रार देणाऱ्या महिलेला न्यायालयाने चांगलीच अद्दल घडवीली असून तिच्याविरुद्ध जन्मठेपेची शिक्षा असलेल्या भा.दं.वि. १९४ च्या गुन्ह्याअंतर्गत कारवाई करण्याचे आदेश देत वाई येथील न्यायालयाचे सहाय्यक अधीक्षक श्री. एस.डी. ढेकणे यांना फिर्यादी म्हणून काम पाहण्यासाठी नियुक्त केले आहे. कायद्यातील तरतुदीनुसार सदर प्रकरणात आरोपीला जामीन मिळणे अशक्य असून संपूर्ण खटलासुद्धा आरोपी महिलेस तुरुंगात ठेवूनच चालविला जाईल अशी शक्यता असल्याचे मत अर्जदार मनीष मिलाणी यांचे वकील ॲड. निलेश ओझा यांनी व्यक्त केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे आहे की, पुणे येथील प्रसिद्ध व्यावसायिक मनीष मिलाणी यांची विमाननगर, पुणे येथे ८० एकर जागा ही अत्यंत मोक्याच्या जागी आहे. त्या जागेची बाजारभावाने किंमत हजारो कोटींमध्ये आहे. मिलानी यांच्याकडून खंडणी वसूल करण्याच्या उद्देशाने पुणे येथील एका गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वकीलाने खोटे दस्तावेज व खोटे पुरावे रचून फिर्यादीस त्रास देण्याचा प्रयत्न केला; परंतु तो त्यात यशस्वी होवू शकला नाही. मिलाणी यांच्या दक्षतेमुळे व कायदेशीर लढाईमुळे शेवटी आरोपी ॲड. सागर राजाभाऊ सूर्यवंशी हा अटक झाला. जामीनीवर बाहेर आल्यानंतर आरोपीने पुन्हा खोटे पुरावे रचून बेताल आरोप करण्याचे प्रकार सुरु केले. त्याने फिर्यादींविरुद्ध ॲट्रॉसिटी कायदा व इतर अनेक खोट्या तक्रारी दाखल करण्यास लावल्या. परंतु मिलाणी यांनी आरोपींच्या दबावाला बळी न पडता कायदेशीर लढा सुरूच ठेवला. या सर्व प्रकरणात आरोप खोटे सिद्ध होवून पोलिसांनी अनेक प्रकरणात सागर सूर्यवंशी व इतर यांच्याविरुद्ध आरोपपत्र सुद्धा दाखल केले. सागर सूर्यवंशीचा जामीन हा पुणे येथील सत्र न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत फेटाळण्यात आला व सर्वोच्च न्यायालयाने आरोपीस शरण येण्यास सांगितले. सागर सूर्यवंशी हा शरण येण्याऐवजी फरार झाला. त्यानंतर आरोपीने काही महिलांना हाताशी धरून बलात्काराच्या खोट्या केसेस दाखल केल्या. परंतु पोलीस तपासात त्या केसेस खोट्या सिद्ध झाल्या.

पोलिसांनी केंद्रीय गुप्तचर विभाग (I.B.), केंद्रीय गृह मंत्रालय, मोबाईल टॉवर लोकेशन इत्यादी पुराव्याच्या आधारे आपला अहवाल सादरकरतांना असे नमूद केले आहे कि, महिलेने ज्या दोन तारखेला तिच्यावर बलात्कार व धमकी दिल्याबाबत तक्रार दिली होती, त्यावेळी अर्जदार मिलाणी हा परिवारासह परदेशात अमेरिका येथे होता.

आरोपी महिलेने पोलिसांच्या त्या अहवालास आव्हान देणारी हरकत याचिका (Protest Petition) दाखल केली. परंतु न्यायालयाने महिलेची याचिका फेटाळून लावली व पोलिसांचा अहवाल मान्य केला. तसेच न्यायालयाने अर्जदार मनीष मिलानी यांनी महिलेविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३४० Cr.P.C. नुसार दिलेला अर्ज मंजूर करत महिलेविरुद्ध कारवाई आवश्यक असल्याचे मत नोंदवून न्यायालयाने स्वत: फिर्यादी बनण्याचा निर्णय घेत न्यायालयाचे सहा अधीक्षक श्री. एस.डी. ढेखणे यांना फिर्यादी म्हणून प्रकरण चालविण्यास नियुक्त केले आहे. आरोपी महिलेविरुद्ध भा.दं.वि.चे कलम १९३, १९४, १९९, २००, २११ आदी कलमांतर्गत केस दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सदर प्रकरणात महिलेच्या गैरकृत्यामध्ये तिला सहकार्य करणारे व फौजदारी कटात सामील इतरही आरोपीविरुद्ध तशीच कारवाई करण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ३४१ नुसार सत्र

(उर्वरित पान २ वर)

